


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : ७९७ वा रविवार दि. ०९ जून २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# नरेंद्र मोदी आज तिसऱ्यांदा घेणार पंतप्रधानपदाची शपथ

## दिल्ली हाय अलर्टवर, हे परदेशी पाहुणे राहणार उपस्थित...

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी आज, रविवारी संध्याकाळी सव्वासात वाजता ऐतिहासिक राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात सलग तिसऱ्या वेळेस पंतप्रधानपदाची शपथ घेतील. शपथविधीच्या या भव्य सोहळ्यासाठी ५०० सीसीटीव्ही व निमलष्करी दलाच्या पाच कंपन्या या परिसरात तैनात असतील. राष्ट्रपती भवनाच्या याच प्रांगणात सन २०१४ आणि सन २०१९मध्येही मोदी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती. मोदी यांच्यासोबत रविवारी एनडीएच्या १४ मित्रपक्षांचे किमान १८ खासदार मंत्रिपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. यापैकी सात कॅबिनेट मंत्री आणि उर्वरित ११ स्वतंत्र प्रभार आणि राज्यमंत्री असतील, असे कळते.मालदीवचे राष्ट्रपती डॉ. महंमद मुईझ्झू यांच्यासह नेपाळ, मॉरिशस, सेशेल्स, भूतान, श्रीलंका व बांगलादेशाच्या राष्ट्रप्रमुखांना नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण पाठविण्यात आले आहे.राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात (कोर्ट यार्ड) भव्य सजावट करण्यात आली आहे. मोदी व अन्य मंत्री शपथ घेतील. त्यासाठी या प्रांगणात एक खास व्यासपीठ तयार करण्यात आले आहे. पाहुण्यांच्या स्वागतासाठी पुढच्या भागात लाल गालिचा (रेड कार्पेट) अंथरण्यात आला आहे. आठ हजारांहून अधिक पाहुण्यांसाठी आसन व्यवस्था करण्यात आली आहे.या सोहळ्यासाठी भारताच्या ङ्गनेबरहुड पॉलिसीफ आणि ङ्गसागरफ व्हिजनअंतर्गत शेजारील देशांच्या नेत्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. मात्र, पाकिस्तान, चीन आणि म्यानमार या शेजारी देशांना या समारंभासाठी आमंत्रित केलेले नाही. शेजारच्या देशांचे दोन राष्ट्रपती, एक उपराष्ट्रपती आणि चार पंतप्रधान मोदींच्या शपथविधीला उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान कार्यालयाच्या निवेदनानुसार श्रीलंकेचे अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे, डॉ. मुईझ्झू, सेशेल्सचे उपाध्यक्ष अहमद अफिफ, बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना, मॉरिशसचे पंतप्रधान प्रवींदकुमार



जगन्नाथ, नेपाळचे पंतप्रधान पुष्पकमल दहल ङ्गप्रचंडफ आणि भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे यांनी भारताचे निमंत्रण स्वीकारले आहे. पंतप्रधान शेख हसीना दिल्लीत पोहोचल्या आहेत. या विशेष अतिथींसाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रविवारी संध्याकाळी मेजवानीचे आयोजन केले आहे.

# खोटे दस्तावेज तयार करणाऱ्यांवर कारवाई करा-ओमप्रकाश टेकडीवाल यांची मागणी

जनसंचलन/ शेगाव

आधीच विक्री जमिनीचे खोटे बक्षिस पत्र तयार करून संगनमताने गैरकृत्य करणाऱ्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई करा अशी मागणी ओमप्रकाश टेकडीवाल यांनी केली आहे. सविस्तर असे की शेगाव भाग २ मधील सर्वे क्रमांक ३४५/१ मध्ये तत्कालीन मूळ मालक रामराव हनुमंतराव भांड यांच्या नावाने ३३ एकर जमीन होती. सन १९४७ मध्ये भांड यांनी नारायण भगवानदास राठी यांना २३ एकर ९ गुंठे जमीन खरेदी खताने विक्री केली. नंतर सन १९५१ मध्ये राठी यांनी हजारीमल बहादरचंद माहेश्वरी खरेदी खताने ही जमीन विक्री केली. त्यानंतर सन १९५३ मध्ये माहेश्वरी यांनी गिरधारीलाल मोतीलाल अग्रवाल (टेकडीवाल) यांनाही जमीन खरेदी खता द्वारे दस्त क्र ११३८ अन्वये २३ एकर ९ गुंठे जमीन विक्री केलेली आहे. त्यानंतर रामराव भांड यांच्याकडे सर्व्हे क्र ३४५ मध्ये जमीन शिल्लक नसताना सुद्धा दि. १५/०२/ १९७५ मध्ये रजिस्टर बक्षीस पत्र दस्त क्रमांक ११९/१९७५ नुसार १८ एकर जमीन प्रकाश केशवराव देशमुख यांना बक्षीस दिली. उपरोक्त दस्तऐवजावरून सदर जमीन गिरधारीलाल अग्रवाल यांनी आधीच खरेदी केलेली असताना सुद्धा प्रकाश केशवराव देशमुख आणि रामराव हनुमंतराव भांड यांनी संगम मताने गुन्हा करून तसेच राजकीय दबावात तत्कालीन अधिकाऱ्यांना हाताशी धरून आणि आर्थिक देवाणघेवाण करून खोटे दस्त अस्तित्वात आणले आहेत. त्यामुळे शासकीय परिपत्रकानुसार सदर गुन्हेगार फौजदारी कारवाईसाठी पात्र आहेत. त्यामुळे खोटे दस्त तयार करून पात्र नसलेल्या दस्त नोंदणी केल्यामुळे सर्व संबंधित गुन्हेगारांवर नियमानुसार योग्य ती फौजदारी कारवाई करण्यात यावी अशी




मागणी ओम प्रकाश टेकडीवाल यांनी विद्यमान दुय्यम निबंधकांकडे केली आहे. अर्जदार टेकडीवाल यांच्याकडे मूळ खरेदीखत असून सुद्धा सदर प्रकरणात आर्थिक व राजकीय दबावामुळे त्यांच्यावर आतापर्यंत अन्याय झाला असून आता आरोपींवर कारवाई करून मला न्याय मिळावा असे त्यांचे म्हणणे आहे. आमच्या जमिनीचे आरोपींनी संगणमताने खोटे दस्त तयार करून गुन्हा केला आहे. राजकीय दबावात प्रकरण दडपण्याचे प्रयत्न सुरू असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नियमानुसार गुन्हेगारांवर निर्भिडपणे योग्य कारवाई करावी आणि आम्हाला न्याय मिळवून द्यावा.

# प्राथमिक आरोग्य केंद्र रायपुर येथे मानसिक आरोग्य शिबीर



जनसंचलन/चिखली -

प्राथमिक आरोग्य केंद्र रायपुर व जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम जिल्हा रुग्णालय बुलढाणा अंतर्गत आज दिनांक ८ जून २०२४ रोजी सैलानी येथे मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर गीते सर यांच्या मार्गदर्शनाखाली मानसिक आरोग्य निदान व महा आरोग्य शिबीर तसेच हिवताप जनजागरण मोहीम राबविण्यात आले. यावेळी सैलानी दर्गा येथील शिबिरामध्ये रुग्णांची तपासणी करण्यात आली. तसेच त्यांना मेडिसिनचे वाटप करण्यात आले. यावेळी मा. तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एम डी सरपते , मा.वैद्यकीय अधिकारी डॉक्टर शेख उस्मान , डॉ. महेश बाहेकर , डॉ. कुणाल शेवाळे, डॉ. वैष्णव , डॉ. पंकज राठोड , डॉ. वसीम चौधरी , डॉ. कल्याणी गायकवाड समुदाय आरोग्य अधिकारी, श्रीमती . पी ए क्षिरसागर ,पुजा वानखेडे, अर्चना आराख, विभा घाडगे व सर्व आरोग्य कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नीट परीक्षेत झालेल्या गैरप्रकाराची सीबीआय चौकशी करावी :- ॲड.जयश्री शेळके

जनसंचलन/बुलढाणा

वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या राष्ट्रीय पात्रता सह-प्रवेश परीक्षेमध्ये (नीट) झालेल्या गैरप्रकाराची सीबीआय चौकशी करावी अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिव ॲड. जयश्री शेळके यांनी केली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत दरवर्षी राष्ट्रीय पात्रता सह-प्रवेश परीक्षा (नीट) घेण्यात येते. यावर्षी घेण्यात आलेल्या नीट परीक्षेचा नुकताच निकाल जाहिर करण्यात आला आहे. नीट परिक्षेमध्ये चांगले गुण घेवून गुणवत्ता यादीत अव्वल येण्याचे स्वप्न विद्यार्थी उराशी बाळगून असतात. परंतु देशातील टॉपच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये मर्यादीत जागा असल्याने चांगल्या महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळणे कठीण असते. यावेळी लागलेल्या निकालात विद्यार्थ्यांना अनपेक्षित गुण मिळाल्याने पालकांनी परीक्षेमध्ये भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप प्रशासनावर केला आहे. नीट परीक्षा होण्यापुर्वीच पेपर लिक झाल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमांवर प्रसारित झाल्या होत्या. परीक्षेचे स्वरुप अत्यंत कठीण असूनही यावर्षी एकुण ६७ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले आहेत. यामध्ये हरियाणातील एकाच परीक्षा केंद्रावरील ८ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अनेक शिक्षकांच्या मते एकाच परीक्षा केंद्रावर अशा प्रकारे पैकीच्या पैकी गुण मिळणे शक्य नाही. ज्या विद्यार्थ्यांना पेपर उशीरा मिळाला अशा विद्यार्थ्यांना ग्रेस दिल्याने किंवा गुणांचे सामान्यीकरण केल्याने विद्यार्थ्यांना जास्त गुण मिळाले आहेत असा खुलासा नॅशनल टेस्टिंग एजन्सीने केला आहे. मात्र लोकसभा निवडणूकीच्या निकालाची तारिख असतांनाच नीट परिक्षेचा निकाल



जाहिर करण्याची घाई एजन्सीने का केली असा देखील आरोप पालक वर्गाकडून केला जात आहे. त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांचा रोष लक्षात घेवुन यावर्षी झालेल्या राष्ट्रीय पात्रता सह-प्रवेश परीक्षा (नीट) परीक्षेत झालेल्या गैरप्रकाराची सीबीआय चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर तसेच दोषी विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिव ॲड.जयश्री शेळके यांनी राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडे केली आहे.

# डोक्यावर पडून गंभीर जखमी झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू

जनसंचलन/मलकापूर



येथील रामवाडी परिसरात रविवारी पायऱ्यांवरून पडत डोक्यावर गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्याने २० वर्षीय युवक अत्यवस्थ झाला होता. तब्बल चार दिवसांची त्याची मृत्यूशी झुंज बुधवारी संपुष्टात आली. रात्रीच्या वेळी उपचारांदरम्यान आर्यनचा मृत्यू झाला. विज्ञान महाविद्यालयातील लायब्ररीयन गजानन चव्हाण यांचा धाकटा मुलगा आर्यन हा जळगाव खान्देशातील अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत होता. काही दिवसांपूर्वी तो स्वगृही परतला होता. रविवारी सकाळी आर्यनची तब्येत बिघडली, त्याने उपचार घेतले. दुपारी पाण्याची कॅन बाहेरून आणल्यानंतर तो पायऱ्यांवरून कोसळल्याने डोक्यात गंभीर मार बसला. तो अत्यवस्थ झाला. त्याला तत्काळ येथील खासगी दवाखान्यात दाखल करण्यात आले. मात्र, त्याची प्रकृती खालावल्याने बुलढाणा रेफर करण्यात आले. परंतु, आर्यनची प्रकृती खालावली. त्यामुळे संभाजीनगर हलविण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. मात्र, त्याला जळगाव खान्देशात हलविण्यात आले. गत चार दिवसांपासून त्याच्यावर शर्थीचे उपचार सुरू होते. बुधवारी रात्री आर्यनचा मृत्यू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# बी-बियाणे, खते घेतांना घ्या काळजी अन्यथा होऊ शकते फसवणूक !



जनसंचलन/बुलडाणा

येत्या खरीप हंगामासाठी बी बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता अधीक शकते, त्यामुळे शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी गुणवत्ता व दर्जाची हमी देणाऱ्या अधिकृत विक्रेत्याकडूनच बियाणे खरेदीस प्राधान्य द्यावे. बनावट, भेसळयुक्त बियाणे खरेदी टाळण्यासाठी अधिकृत विक्रेत्याकडून देयकासह खरेदी करावे. बिलावर बियाणाचा संपूर्ण तपशील यात पीक, वाण, संपूर्ण लॉट नंबर, बियाणे कंपनीचे नाव, किंमत व आपण स्वतः बिलावर सही, अंगठा देऊन विक्रेत्याची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. खरेदी केलेल्या बियाणांचे वेष्टन, पिशवी, टॅग, खरेदीची बिले व त्यातील थोडे ओंजळभर बियाणे पिकाची कापणी होईपर्यंत जपून ठेवावे. खरेदी केलेले बियाणे त्या हंगामासाठी शिफारस केल्याची खात्री करावी. भेसळीची शंका दूर करण्यासाठी बियाणाची पाकिटे, बॅग सीलबंद, मोहोरबंद असल्याची खात्री करावी. बियाणे उगवणीच्या खात्रीसाठी पाकिटावरची बॅगवरील अंतिम मुदत पाहून घ्यावी. तसेच कमी वजनाच्या निविष्ठा, तसेच छापील किंमतीपेक्षा जास्त किमतीने विक्री अथवा इतर तक्रार शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या कृषी अधिकारी पंचायत समिती, तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रक निरीक्षक, मोहीम अधिकारी जिल्हा परिषद येथे करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# नांदुरा येथील अंबादेवी गड (खैवाडी) येथील अवैध दारु विक्री बंद करा:-भागवत पेठकर...

जनसंचलन/ नांदुरा

अंबादेवी गड (खैवाडी) नांदुरा या परिसरामध्ये प्रसिध्द देवी-देवतांची मंदिरे असून तिथे दररोज खुप संख्येने महिला, मुली व पुरुष दर्शनाकरीता येतात. परंतु या परिसरामध्ये सुनिल रामभाऊ नितोने हा व्यक्ती उघडपणे कुणाचीही भिती न बाळगता मंदिर परिसराच्या बाजूला अवैधरित्या दारु विकतो.त्यामुळे या परिसरातील महिलांना त्रास होतो. कारण या ठिकाणी बाहेरुन दारु पिण्याकरीता आलेले लोक हे दररोज आपापसांत भांडणे करुन एकमेकांना अश्लिल भाषेत शिवीगाळ करतात व त्यामुळे स्त्रीया व लहान मुलांवर त्याचा विपरीत परिणाम होवून या ठिकाणी भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच या परिसरातील शाळकरी मुले व्यसनाधिन होत आहेत.या ठिकाणी रात्री-बेरात्री लोक दारु पिण्याकरीता येत असल्यामुळे संध्याकाळच्या वेळेस महिलांना घराच्या बाहेर निघणे सुध्दा कठीण झाले आहे. करीता सुनिल रामभाऊ नितोने याच्यावर लवकरात लवकर कारवाई करुन




त्याचा वरील ठिकाणी सुरु असलेला अवैध धंदा तात्काळ बंद करण्यात यावा.न्यथा आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन करु व त्या दरम्यान उद्भवणाऱ्या संपूर्ण परिणामास पोलीस प्रशासन जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.असा तक्रार अर्ज सामाजिक कार्यकर्ते भागवत पेठकर,प्रवीण वसे, बळीराम बावस्कर,रमेश राजस, रामा रहाटे,संतोष गंगातिरे, शिवा आमले, अजय बराटे,प्रमोद पोटे,गणेश वसे,शुभम गंगातिरे,पवन वसे,निंबाजी पोटे,सागर मस्कुटे, शुभम राजनकर, मिलिंद इंगळे, राजेश गावंडे,ऋषिकेश गंगातीरे यांनी स्थानिक नागरिकांसह जाऊन नांदुरा ठाणेदार श्री विलास पाटील यांना दिला आहे व सदर तक्रार अर्जाची प्रतिलीपी बुलढाणा जिल्हाधिकारी ,जिल्हा पोलिस अधीक्षक बुलढाणा,अप्पर पोलीस अधीक्षक खामगाव,उपविभागीय अधिकारी मलकापूर यांना देण्यात आले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अल्पवयीन मुलीचा विनयभंग एकास पाच वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा...

जनसंचलन/बुलढाणा

अल्पवयीन मुलगी घरात अभ्यास करत असताना एका २७ वर्षीय विवाहित व्यक्तीने तिचा विनयभंग केल्याप्रकरणी बुलढाणा न्यायालयाने आरोपीस पाच वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. बुलढाणा येथील जिल्हा न्यायाधीश कोर्ट क्रमांक १ चे न्यायाधीश आर. एन. मेहरे यांनी हा निकाल दिला. बुलढाणा शहराला लागून असलेल्या एका गावातील १६ वर्षीय मुलगी ही १३ मार्च २०१९ रोजी तिच्या घरात रात्री अभ्यास करत होती. यावेळी तिच्या घर-शेजारी राहणाऱ्या एकाने घरात घुसून तिचा विनयभंग केला. या प्रकरणामुळे घाबरलेली मुलगी ओरडली. तेव्हा आरोपीने तिला जिवे मारण्याची धमकी दिली; परंतु तोवर मुलीचे कुटुंबीय तेथे दाखल झाले तेव्हा आरोपीने तेथन पलायन केले. याप्रकरणी बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



या प्रकरणाचा तपास करून पोलिस उपनिरीक्षक संतोष जंजाळ यांनी बुलढाणा न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणात वादी पक्षातर्फे ९ साक्षीदार तपासण्यात आले. त्यांची साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. प्रतिवादी पक्षातर्फेही बचावाच्या दृष्टीने दोन साक्षीदारांची साक्ष झाली; परंतु वादी पक्षाने घेतलेल्या साक्षी या एकमेकाला परक असल्याकारणाने विश्वासाहार्य आणि महत्त्वपूर्ण ठरल्या. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून बुलढाणा न्यायालयाचे न्यायाधीश आर. एन. मेहरे यांनी आरोपी प्रवीण प्रल्हाद खिल्लारे यास पाच वर्षे सश्रम कारावासासह अन्य विविध कलमांन्वये शिक्षा सुनावली. सोबतच ६ हजार रुपयांचा दंडही सुनावला. यापैकी पाच हजार रुपये हे पीडित युवतीला देण्यासाबेतच निकालाची एक प्रत जिल्हा विधिसेवा प्राधिकरणाकडेही पाठविण्यात आले आहे

# जिल्हा परिषदचे सिईओपदी कुलदीप जंगम यांची नियुक्ती

जनसंचलन/बुलढाणा




नांदेड जिल्ह्यात देगलूर येथे सहायक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असलेले कुलदीप जंगम यांची बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ७ जून रोजी त्यांनी पदभार स्वीकारला. मुंबई मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे यांच्या पत्रानुसार ही बदली झाली आहे. चार जून रोजीच यासंदर्भातील आदेश निर्गमित झाले होते. दरम्यान, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त यांच्या सल्ल्यानुसार दुसऱ्या अधिकाऱ्याकडे देगलूर येथील पदभार सोपवून त्यांनी ७ जून रोजी बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला आहे. यापूर्वीचे बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांची बदली झाल्यानंतर त्यांचा पदभार बी. एम मोहन यांच्याकडे सोपविण्यात आला होता. आता त्यांच्याकडून जंगम यांनी पदाची सूत्रे स्वीकारली. बुलढाणा जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले आहे.

# लोणार मध्ये झाला अभयारण्यचा वाढदिवस साजरा

जनसंचलन/ लोणार

जगविख्यात लोणार सरोवर मधील परिसर सन २००० साली लोणार सरोवर अभयारण्य म्हणून घोषित झाले. बेस्साल्टिक रॉक मधून तयार झालेले एकमेव सरोवर म्हणून लोणार सरोवराची ओळख आहे. लोणार सरोवर अभयारण्य हे ३६५ हेक्टर जागेतील जिल्ह्यातील सर्वात लहान अभयारण्य ठरले. या अभयारण्याचा २४ वा वर्धापन दिन असून मी लोणारकर टीम ने अनोख्या पद्धतीने हा वर्धापन दिन आज ८ जून रोजी सकाळी साजरा केला. सरोवराकाठी नैसर्गिक केक कलिंगडाचे कटिंग करत आगळ्यावेगळ्या पद्धतीने वर्धापन दिन साजरा करण्यात आला. मेहकर, वाशिम, रिसोड, लोणार येथील निसर्गप्रेमी नागरिकांनी मी लोणारकर अशी टीम तयार केली. जगविख्यात लोणार सरोवराचे संवर्धन करणे, सरोवराकाठी स्वच्छता ठेवणे, सरोवर परिसरातील मंदिरांची स्वच्छता राखणे, अशा पद्धतीचे कामे ही टीम राबवत असते. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या टीमची दखल घेऊन त्यांचे कौतुकही केले होते. मी लोणारकर या टीम मध्ये जवळपास ५० ते ६० उच्चशिक्षित सदस्य आहेत. लोणार सरोवर अभयारण्यातील ३५६ हेक्टर परिसरामध्ये बिबट,



कोल्हे, यांसारख्या अनेक वन्य प्राण्यांचा वावर आहे. शहराला लागूनच असलेल्या या अभयारण्यातून कधी माणूस व हिस्त्र प्राण्यांचा संघर्ष झाला नाही हे विशेष. लोप पावत चाललेल्या पर्यावरणाचे संवर्धन करणे हे अत्यंत गरजेचे आहे. अभयारण्याचा देखील वाढदिवस अर्थात वर्धापन दिन साजरा झाल्याने एक प्रकारे पर्यावरण संवर्धनाची प्रेरणा मिळते. असे मी लोणारकर टीमने सांगितले. बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर जगाच्या पाठीवर नावाजलेले सरोवर आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून लोणार सरोवर महोत्सव झालेला नाही. मोठ्या पातळीवर लोणार महोत्सव साजरा झाला पाहिजे ही मागणी आहे. तसेच शासकीय स्तरावर देखील वनविभाग, पुरातत्व विभाग यातून अभयारण्याचा वर्धापन दिन साजरा झाला पाहिजे. अशी सर्व लोणार प्रेमी, पर्यावरण प्रेमी नागरिकांची मागणी प्रलंबित आहे. शासनाने यावर लक्ष दिले पाहिजे.

# मा.आ.धृपदराव सावळे पाटील यांचे संपर्क कार्यालयाचे उत्साहात उद्घाटन...

जनसंचलन/बुलढाणा

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तसेच जनतेच्या सेवेसाठी आज दि.०७/०६/२०२४ रोज शुक्रवार ला मा.आमदार धृपदराव सावळे यांची मुलगी अड. सौ. किर्ती समीर प-हाड यांच्या हस्ते कार्यालचे फित कापून व श्री संत गजानन महाराज यांचे प्रतिमेचे पूजन करून जल्लोषात, मोठ्या उत्साहात उद्घाटन पार पडले. धृपदराव सावळे यांनी १९७७ साली डोंगरशेवली गावचे सरपंच, १९७८ साली सचिव चिखली तालुका कोंग्रेस कमिटी, १९७९ साली सदस्य बुलढाणा जिल्हा परिषद, १९७९ ते १९९० संचालक बुलढाणा जिल्हा दूध संघ, १९८० ते १९८२ सभापती अर्थ व बांधकाम जिल्हापरिषद बुलढाणा, १९८० ते २००४ संचालक बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँक, १९८२ साली अध्यक्ष तालुका खरेदी विक्री संघ चिखली, १९८५ ते १९९० अध्यक्ष जिल्हा परिषद बुलढाणा, १९८६ साली अध्यक्ष जिल्हा युवक कोंग्रेस बुलढाणा, १९९१ साली सभापती कृषि उत्पन्न बाजार समिति चिखली, १९९२ ते १९९७ दुसर्यांदा सदस्य जिल्हा परिषद बुलढाणा, १९९८ साली दुसर्यांदा अध्यक्ष जिल्हा परिषद बुलढाणा, १९९९ ते २००४



बुलढाणा विधानसभा मतदार संघात कोंग्रेस या पक्षातून निवडून येऊन आमदार पद भूषविले. त्याचप्रमाणे १९९९ ते २००४ (राज्यमंत्री दर्जा) संचालक महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळ मुंबई, १९९९ ते २००४ सदस्य विदर्भ वैधानिक विकास महामंडळ नागपुर, २०११ ते २०१२ अध्यक्ष जिल्हा केंद्रीय सहकारी बँक बुलढाणा, २०१६ साली जिल्हाध्यक्ष भारतीय जनता पार्टी बुलढाणा असे अनेक पदे यशस्वीरीत्या भूषविले आहेत. संपर्क कार्यालयाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी डॉ.समीर प-हाड, सौ.पद्माताई सावळे, श्री.डॉ.गणेश कोल्हे,श्री. बबन हरिभाऊ पाटील, श्री.बबन म्हातारजी पाटील, श्री. संजय गाढे, श्री.दादाराव लवकर (सरपंच येळगाव), श्री.संजय पवार, श्री. शिवाजी तायडे, श्री.कैलास सावळे, श्री, राजू सावळे, श्री.प्रशांत इंगले, श्री. पी.एस.राणे, श्री.डॉ.गौरव हरलालका, श्री.विजय जगताप, श्री.संदीप हुरपडे, श्री.सागर सोनुणे, श्री.विलास भगत, श्री.शरद तायडे, दिपक पुराणे, श्री.संजय हेलोडे, कैलास लडके, श्री.सुरेश धोटे, श्री.प्रशांत बराटे, श्री.विनोद धनवे, श्री.किशोर कुहीरे, श्री. रवी अम्भोरे आदि मंडळी उपस्थित होती.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विधानसभा जिंकेपर्यंत शांत बसणार नाही - देवेंद्र फडणवीसांचा निर्धार

वृत्तसंस्था/मुंबई

आपण तीन पक्षांच्या विरोधात निवडणुकीची तयारी करून लढलो, मात्र विरोधकांनी केलेला खोटा प्रचार या चौथ्या पक्षाच्याविरोधात आपण तयारीच केली नव्हती. आपल्या अपयशाचे हेच मुख्य कारण आहे,फ असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी स्पष्ट केले. आता एकमेकांवर आरोप किंवा पराभवाची विश्लेषणे करत बसू नका, असा सल्लाही त्यांनी महायुतीच्या नेत्यांना दिला. ङ्कमी मैदान सोडून पळणार नाही, विधानसभेवर महायुतीचा झेंडा फडकेपर्यंत मी शांत बसणार नाही,फ असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.भाजपच्या दादर येथील पक्ष कार्यालयात पार पडलेल्या आमदारांच्या बैठकीत फडणवीस यांनी लोकसभा निवडणुकीतील पराभवाची कारणे सांगतानाच, उपमुख्यमंत्रिपद सोडण्याबाबत केलेल्या वक्तव्याचाही खुलासा केला. ङ्कयशाचे बाप अनेक असतात, पण अपयश ताकदीने अंगावर घेत ते पचवायचे आणि नवीन निर्धार करायचा असतो. भाजपचे नेतृत्व करत असल्यानेच मी अपयशाची जबाबदारी घेतली. या निवडणुकीत आपण फक्त तीन पक्षांशी नाही, तर चार पक्षांशी लढत होतो. तो चौथा पक्ष म्हणजे खोटा प्रचार होता. तो आपल्या लक्षात आला नाही. त्यामुळे आपण त्याला रोखू शकलो नाही, किंबहुना रोखण्यासाठी तयारी करू शकलो नाही,फ असे ते म्हणाले. ङ्ककाही ठिकाणी समन्वयाचा अभाव आढळला आहे. तो टिपलेला आहे. तो जाहीरपणे बोलण्याची गरज नाही. मी मित्रपक्षांच्या नेत्यांना सांगणार आहे. कोणकोणत्या आमदारांच्या मतदारसंघांत समन्वय नव्हता, हेदेखील मांडेन,फ असे त्यांनी सांगितले.निकालानंतर महायुतीतील तिन्ही पक्षांचे प्रवक्ते विश्लेषण करीत आहेत. मात्र ही बाब गंभीर असून वादग्रस्त बोलणे टाळा,फ असा थेट सल्ला फडणवीस यांनी यावेळी दिला. ङ्कविजय-पराजय होत असतो, पण त्यांचे खापर कोणावरही फोडू नका. आता उणीधुणी काढण्याची वेळ नाही. महायुतीतील प्रवक्त्यांनी समजून-उमजून बोलावे. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनाही यावर लक्ष देण्याबाबत सांगितले आहे. नितेश राणे यांनाही बोलताना तारतम्याने बोलण्याची समज दिली आहे. एकमेकांना सोबत घेऊन चला. आता विधानसभेच्या तोंडावर एकाच सुरात बोला. सगळ्यांच्या पक्षांत काही नेत्यांच्या तक्रारी असतील, पण वरिष्ठ नेत्यांनी त्या समजून घ्या. उगाच काही बोलून बातम्या पेरू नका,फ असे सल्लेही फडणवीस यांनी मित्रपक्ष आणि भाजपला दिले.निकालानंतर महायुतीतील तिन्ही पक्षांचे प्रवक्ते विश्लेषण करीत आहेत. मात्र ही बाब गंभीर असून वादग्रस्त बोलणे टाळा,फ असा थेट सल्ला फडणवीस यांनी यावेळी दिला. विजय-पराजय होत असतो, पण त्यांचे खापर कोणावरही फोडू नका. आता



उणीधुणी काढण्याची वेळ नाही. महायुतीतील प्रवक्त्यांनी समजून-उमजून बोलावे. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनाही यावर लक्ष देण्याबाबत सांगितले आहे. नितेश राणे यांनाही बोलताना तारतम्याने बोलण्याची समज दिली आहे. एकमेकांना सोबत घेऊन चला. आता विधानसभेच्या तोंडावर एकाच सुरात बोला. सगळ्यांच्या पक्षांत काही नेत्यांच्या तक्रारी असतील, पण वरिष्ठ नेत्यांनी त्या समजून घ्या. उगाच काही बोलून बातम्या पेरू नका,फ असे सल्लेही फडणवीस यांनी मित्रपक्ष आणि भाजपला दिले.

## महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सर्वकष प्रयत्नांची व शाश्वत विकास उद्दिष्टांची आवश्यकता

### सेंट पिटर्सबर्ग इंटरनॅशनल इकॉनॉमिक्स फोरम येथे डॉ. नीलम गोऱ्हे यांचे प्रतिपादन

वृत्तसंस्था/मुंबई

सेंट पिटर्सबर्ग येथे भरलेल्या सेंट पिटर्सबर्ग इंटरनॅशनल इकोनॉमिक्स फोरमच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. नीलम गो-हे या बोलत होत्या. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी श्रीमती गुझेलीया इमाऐव्हा, मुख्य कार्यकारी अधिकारी नाफी रिसर्च सेंटर, श्रीमती गॅलीनो कॅरेलोव्हा, उपाध्यक्ष, रशियन फेडरेशन असेम्बली, नॉर्दन अफेअर्स, हिंद अल नक्वी, वरीष्ठ व्यवस्थापक नवाह एनर्जी कंपनी, श्रीमती ऐलीना इसागुलोव्हा उपाध्यक्ष, व्ही. के. कंपनी, श्रीमती मरीना मेडव्हेडेव्हा व्यवस्थापकीय संचालक, सीबूर, श्रीमती ॲलेक्झाड्रीया बिक संस्थापक, अणु उद्योग महिला संघटना, श्रीमती ल्युड मिला शेरबाकोव्हा, अध्यक्ष, व्हेल फार्म, श्रीमती तत्याना याकोलेव्हा, केंद्रिय आरोग्य व जैविक यंत्रणा रशियन राष्ट्र आणि श्रीमती ॲना खारमास, उपसंचालक गेम्स ऑफ द फ्युचर्स यांनी ङ्कङ्कबह् केंद्रिय जागतिक अर्थ व्यवस्थेकडे संक्रमण अंतर्गत विकास धोरणाचा स्त्रीयांचा आर्थिक सक्षमीकरणावरील परिणामङ्कङ्क या विषयावरील जागतिक परिसंवादात सहभाग नोंदविला. त्या प्रसंगी बोलताना डॉ. गो-हे म्हणाल्या की, स्त्रीयांच्या आर्थिक उत्थापनासाठी व दारिद्रय निर्मूलनासाठी जागतिकीकरणाचा प्रभाव मोठा आहे. महिलांना संधीची उपलब्धता मिळण्यासाठी व त्यांचे ध्येय पुर्तता होण्यासाठी वर्ल्ड इकॉनॉमिक्स फोरम व कमिशन फॉर स्टेटस ऑफ वुमन यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. कमीशन फॉर स्टेटस ऑफ वुमनने तयार करुन दिलेल्या कृती आराखडयावर जगभरातील सर्व राष्ट्रांना आपले उत्तर सादर करावे लागते. त्यामुळे यास अत्यंत महत्व आहे. स्त्रीयांच्या राजकारणातील वाढत्या सहभागामुळे त्यांचे सक्षमीकरण होण्यास अधिक मदत मिळते. शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी महिलांचा वाढता सहभाग असणे महत्वाचे आहे. लिंग समभाव व आर्थिक सक्षमीकरण यास प्रोत्साहन देणे, मानवी तस्करी, लैंगिक छळ यास प्रतिबंध करणे व बाल हक्कांचे रक्षण करणे आवश्यक आहे. या बाबतीत रशियामध्ये



चांगले प्रयत्न झालेले आहेत. तसेच महाराष्ट्र विधानपरिषद, विधानसभा आणि सेंट पिटर्सबर्ग येथिल विधीमंडळ यांच्या मध्ये झालेला सामंजस्य करार या दृष्टीने महत्वाचा आहे. भारतामध्ये स्टार्ट अप उद्योगाचे प्रमाण वाढत आहे. तसेच हस्त कला व कृषी क्षेत्रातही प्रगती होत आहे. याबरोबरच नैसर्गिक आपत्तीमुळे होत असलेले नुकसान सर्वात जास्त स्त्रीयांना सहन करावे लागते. हि वस्तुस्थिती बदलण्याची आवश्यकता आहे. उपस्थितांनी टाळयाच्या गजरात डॉ. गोऱ्हे यांच्या भाषणाचे कौतुक केले.

## पंकजा मुंडेंविषयी आक्षेपार्ह स्टेटस ठेवल्याप्रकरणी कडकडीत बंद




जनसंचलन/ बीबी

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्याबाबत समाज माध्यमात आक्षेपार्ह स्टेटस ठेवल्यावरून बीड, जालना आणि अहमदनगर काही गावांमध्ये येथे तणावाची स्थिती आहे. दरम्यान या प्रकाराच्या निषेधार्त उद्या रविवारी ओबीसी समाज आणि सकल वंजारी समाजाच्या वतीने बुलढाणा जिल्ह्यातील बीबी गावात बंदची हाक देण्यात आली आहे. गाव परिसरातील सर्व दुकानदारांनी तसेच छोट्या व्यावसायिकांनी बंदमध्ये सहभाग होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले आहे. मंठा तालुक्यातील वझर सरकटे येथील युवक अनिकेत सरकटे या युवकाने लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या बद्दल आक्षेपार्ह स्टेटस ठेवल्या प्रकरणी महाराष्ट्रातील तमाम मुंडे समर्थकासह समाजाच्या भावना दुखावल्या मुळे सर्व समाजातील युवकांनी बिबी पोलीस स्टेशन ला जाऊन आज निवेदन देत घोषणा बाजी करुन सदर आरोपीचा निषेध करत विविध गुन्हे दाखल करण्यासाठी निवेदन दिले. तर या प्रकाराचा निषेध म्हणून उद्या रविवारी बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुकयातील बीबी या गावात बंद पाळण्यात येणार आहे. तर सदर यवकाविरुद्ध गुन्हे दाखल न झाल्यास महाराष्ट्र भर मुंडे समर्थक तिव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा निवेदनात दिला आहे. यावेळी उपसरपंच भास्कर खुळे, देवानंद सानप, गजानन घुले, अजय कायंदे,सह शेकडो नागरिक उपस्थित होते.